## आजचे पंचांग

दिनांक : ९ जुलै २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : नवमी तिथी (सकाळी १०:३७ पर्यंत) त्यानंतर दशमी तिथी नक्षत्र : अश्विनी नक्षत्र (दुपारी ०२:५५ पर्यंत) त्यानंतर भरणी नक्षत्र योग : सुकर्मा योग (सकाळी १०:११ पर्यंत) त्यानंतर धृति योग करण : गराजा करण (सकाळी १०:३७ पर्यंत)त्यानंतर

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## स्वारगेट-गरवारे मेट्रो स्थानकांत गळती

**पुणे :** गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुणेमेट्रोच्या स्वारगेट स्थानकामध्ये छताला गळती लागल्याचे समोर आले आहे. स्थानकाच्या छतातून पाणी थेट प्रवाशांच्या ये-जा करण्याच्या ठिकाणी गळत असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबतचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 गुरूवार, दि. ९ जुलै २०२६ वर्ष - १ अंक -२८२ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पुणे जिल्ह्यातील ६० गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला, हजारो लोक अडकले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पानशेत रस्त्यावरील वरदाडे येथील तात्पुरता रस्ता आणि पूल मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात वाहून गेला आहे. यामुळे राजगड, हवेली आणि मुळशी या तीन तालुक्यांतील तब्बल ६० हून अधिक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. यामुळे ६० गावातील हजारो नागरिक, नोकरदार आणि शेतकरी अडकून पडले आहेत', अशी माहिती खासदार सुप्रिया सुळेय यांनी दिली.

'सार्वजनिक वाहतूक, तसेच दूध, भाजीपाला आणि किराणा मालाची वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. पानशेत, वरसगाव धरणांसह लष्कराचे केंद्र, शाळा, बँका आणि सरकारी कार्यालयांना याचा मोठा फटका बसला आहे. सध्या पर्यायी मार्ग म्हणून मालखेड-वसवेवाडी मार्गाचा वापर केला जात आहे, मात्र हा कच्चा, अरुंद रस्ता कमालीचा धोकादायक बनला आहे', अशी माहिती सुळे यांनी दिली आहे. 'रिंग रोडच्या कामासाठी जुना पूल पाडण्यात आला, पण त्यानंतर नागरिकांच्या सुरक्षेचा आणि पर्यायी मार्गाचा विचार गांभीर्याने केला गेला नाही, ही खेदाची बाब आहे. जिल्हाधिकारी पुणे यांना विनंती आहे की कृपया वरदाडे येथील वाहून गेलेल्या पुलाची आणि रस्त्याची तातडीने युद्धपातळीवर दुरुस्ती करण्यात यावी. दळणवळणासाठी सुरक्षित व खात्रीशीर पर्यायी मार्ग त्वरित उपलब्ध करून द्यावा.तसेच या भागातील वीज, आरोग्य आणि इतर अत्यावश्यक सेवा खंडित होणार नाहीत याची काळजी घ्यावी', असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी प्रशासनाला केले.

# मोशीतील इमारत दुर्घटना : कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली गाडली निष्काळजी व्यवस्था?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मोशी येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प परिसरात घडलेली इमारत दुर्घटना ही केवळ अपघात नसून प्रशासनाच्या नियोजनशून्यतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे करणारी घटना ठरत आहे. कचऱ्याच्या प्रचंड ढिगाऱ्याचा भाग अचानक कोसळल्याने त्यालगत असलेली तीन मजली प्रशासकीय इमारत जमीनदोस्त झाली. या दुर्घटनेत सुमारे १५ कर्मचारी ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात आली असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा उंच ढिगारा सैल झाला आणि तो थेट इमारतीवर कोसळला. काही





क्षणांत संपूर्ण इमारत ढिगाऱ्याखाली दबली गेली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन पथक, पोलीस आणि वैद्यकीय यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. जेसीबी आणि अन्य यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अडकलेल्यांचा शोध सुरू आहे.

मात्र या घटनेने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. धोकादायक कचऱ्याच्या ढिगाऱ्यालगत प्रशासकीय इमारत उभारण्याची परवानगी कशी देण्यात आली? पावसाळ्यापूर्वी सुरक्षिततेचे तांत्रिक परीक्षण झाले होते का? संभाव्य भूस्खलन किंवा कचरा घसरण्याचा धोका लक्षात घेऊन कोणती खबरदारी घेण्यात आली होती? या सर्व बाबींवर प्रशासनाने स्पष्ट उत्तर देणे आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरात विकासकामांबरोबरच सुरक्षिततेच्या निकषांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका वारंवार केली जाते. नैसर्गिक आपत्तीचे कारण पुढे करून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न झाला, तर तो नागरिकांच्या सुरक्षेशी केलेला अन्याय ठरेल. या दुर्घटनेची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

तसेच शहरातील सर्व धोकादायक प्रकल्प, कचरा डेपो आणि त्यांच्या परिसरातील इमारतींचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण करण्यात यावे. अन्यथा अशा दुर्घटना पुन्हा घडण्याची भीती कायम राहील. सध्या बचावकार्य सुरू असून अडकलेल्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणा प्रयत्नशील आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे.

### मोशी दुर्घटनेनंतर प्रशासन अलर्ट..! उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या तातडीच्या सूचनांनी बचावकार्याला वेग

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मोशी येथील कचरा डेपोचा डोंगर दुपारी दीड वाजता ढासळला. यामध्ये 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाची प्रशासकीय इमारत पडली असून यामध्ये १९ जण अडकले आहेत. बचावकार्य सुरू असून एनडीआरएफ, पोलिस आणि महापालिका अग्निशामक विभागाचे जवान अडकलेल्या सर्वांना बाहेर काढत आहेत. आतापर्यंत त्यातील ४ व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. बचावकार्य करण्यासाठी एनडीआरएफ घटनास्थळी दाखल झाले असून महापालिकेचा अग्निशमन दल, पोलीस या बचाव कार्यात सहभागी आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल, लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल तसेच अन्य बचाव पथके घटनास्थळी दाखल होऊन बचाव व मदतकार्य सुरू केले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंगल, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी तसेच पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना दिल्या.

## मागण्या ऐकण्याऐवजी वेतन कपातीचा धाक; शिक्षकांच्या आंदोलनावर सरकारची दडपशाही?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्याऐवजी आंदोलन करणाऱ्या शिक्षकांना वेतन कपातीचा इशारा देत शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. ९ जुलै २०२६ रोजी 'शाळा बंद' आणि 'सामूहिक रजा' आंदोलनाची घोषणा झाल्यानंतर शासनाने सहभागी शिक्षक व कर्मचाऱ्यांचे एका दिवसाचे वेतन कपात करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असल्याची टीका शिक्षक संघटनांकडून होत आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले की, शिक्षकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत मागण्यांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करत आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेशी थेट संबंधित प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याऐवजी आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

शिक्षकांची प्रमुख मागणी म्हणजे अशैक्षणिक कामांतून मुक्ती. मतदार यादी पुनरीक्षण, विविध शासकीय सर्वेक्षणे आणि इतर प्रशासकीय कामांमध्ये शिक्षकांना सतत गुंतवले जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. याशिवाय शिक्षक अभियोग्यता परीक्षेच्या धोरणात बदल करून तमिळनाडूच्या धर्तीवर स्वतंत्र आणि ऑफलाइन परीक्षा घेण्याची मागणीही करण्यात आली आहे.

तसेच १५ मार्च २०२४ रोजी लागू करण्यात आलेल्या संच मान्यता धोरणावरही शिक्षकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. या धोरणामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये तीन वर्गांसाठी एकाच शिक्षकाची नियुक्ती होत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा घसरत असून, ग्रामीण शिक्षण व्यवस्था कमकुवत होत असल्याचा दावा संघटनांनी केला आहे.

## शेतजमिनींच्या खरेदीवर सरकारचा कडक इशारा; बनावट शेतकरी बनून जमीन खरेदी करणाऱ्यांवर कारवाईचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात शेतकरी नसतानाही कृषी जमीन खरेदी करण्याच्या वाढत्या प्रकारांवर अखेर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. कोणत्याही व्यक्तीला महाराष्ट्रात शेतकरी असल्याचा वैध पुरावा दिल्याशिवाय शेतजमीन खरेदी करता येणार नाही, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत स्पष्ट केले. या भूमिकेमुळे कृषी जमिनींच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित गैरव्यवहारांवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

धुळे शहराचे भाजप आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे धुळे तालुक्यासह राज्यातील अनेक भागांत महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. कृषी जमीन केवळ पात्र शेतकऱ्यांकडेच राहावी, अशी कायद्याची स्पष्ट तरतूद असतानाही बिगर शेतकरी आणि परराज्यातील व्यक्ती विविध मार्गांनी जमिनी खरेदी करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

यावर उत्तर देताना महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यातील शेतजमिनींची मोठ्या प्रमाणावर तपासणी आणि डिजिटल मॅपिंग करण्यात येणार आहे. विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोपा विमानतळ परिसरातील दोडामार्ग भागात परराज्यातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केल्याचे निदर्शनास आले असून, अशा सर्व व्यवहारांची चौकशी केली जाणार आहे. यापुढे जमीन नोंदणीसाठी येणाऱ्या व्यक्तीच्या नावावर महाराष्ट्रात सात-बारा उतारा आहे का, तो कायदेशीर शेतकरी आहे का, याची पडताळणी करण्यासाठी मुद्रांक विभागाला जमाबंदी आयुक्त कार्यालयाशी जोडण्यात आले आहे. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन खरेदी करणे अधिक कठीण होणार आहे. धुळे जिल्ह्यातील संशयास्पद व्यवहारांचाही सरकारने आढावा घेतला आहे. प्राथमिक तपासणीत काही खरेदीदारांकडे शेतकरी असल्याचे पुरावे उपलब्ध नसल्याचे समोर आले असून, अशा प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन महसूलमंत्र्यांनी दिले.

राज्यातील सुपीक शेतजमिनी केवळ गुंतवणूक, नफेखोरी किंवा भविष्यातील व्यावसायिक विकासाच्या अपेक्षेने मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. सरकारची ही भूमिका प्रत्यक्षात किती प्रभावी ठरते आणि बेकायदेशीर जमीन व्यवहारांवर खरोखरच लगाम लागतो का, याकडे आता शेतकरी आणि सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

## टीईटी नियम व मतदार पडताळणीच्या कामाविरोधात उद्या राज्यभर शिक्षकांचा शाळाबंद आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भातील नियमांमध्ये बदल करण्याची मागणी तसेच शिक्षकांवर सोपविण्यात आलेल्या विशेष मतदार यादी पुनरिक्षण (एसआयआर) व बीएलओच्या अतिरिक्त कामांच्या निषेधार्थ महाराष्ट्रातील शिक्षक संघटनांनी गुरुवार (दि. ९) रोजी राज्यव्यापी शाळाबंद आंदोलनाची हाक दिली आहे.

या आंदोलनात राज्यातील विविध शिक्षक संघटना सहभागी होणार असून अनेक शासकीय व अनुदानित शाळांमधील शैक्षणिक कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. शिक्षक संघटनांच्या म्हणण्यानुसार, अध्यापनाव्यतिरिक्त




सातत्याने विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या दिल्या जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे. तसेच टीईटी संदर्भातील नियमांबाबतही शिक्षकांमध्ये असंतोष आहे.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभाग परिस्थितीवर लक्ष ठेवून असून विद्यार्थी व पालकांनी संबंधित शाळेकडून कामकाजाबाबतची माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिक्षक संघटनांनी आपल्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी शासनाकडे केली आहे.

## ख्रिश्चन मिशनरींच्या मालमत्तांची राज्यव्यापी चौकशी; सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्रातील ख्रिश्चन मिशनरी संस्थांच्या मालमत्तांची राज्यभर तपासणी करण्याच्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या घोषणेनंतर राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

सरकारने या तपासणीमागे मालमत्तांच्या नोंदी, व्यवहार आणि कथित अनियमितता तपासण्याचा उद्देश असल्याचे सांगितले असले, तरी या निर्णयामुळे धार्मिक संस्थांना लक्ष्य केले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कायद्याचे उल्लंघन झाल्यास कोणत्याही संस्थेवर कारवाई होणे आवश्यक आहे; मात्र केवळ धार्मिक ओळखीच्या आधारे तपासणीचा व्यापक आदेश देणे योग्य आहे का, यावरही मतभेद आहेत.

मालमत्ता व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि नियमांचे पालन आवश्यक असले तरी अशा चौकशीची प्रक्रिया निष्पक्ष, पुराव्यावर आधारित आणि सर्व संस्थांना समान निकष लागू करणारी असणे अपेक्षित आहे. अन्यथा प्रशासनाच्या कारवाईवर पक्षपातीपणाचे आरोप होण्याची शक्यता आहे. सरकारच्या या निर्णयातून मालमत्ता व्यवस्थापनातील गैरप्रकार उघड होणार की एखाद्या विशिष्ट समुदायावर संशयाचे वातावरण निर्माण होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पाऊस नाही, प्रशासनच अपयशी! विकासाच्या दाव्यांचा पावसात पुन्हा बुरखा फाटला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात पावसाळा सुरू झाला की एक गोष्ट हमखास घडतेविकासाच्या गगनभेदी घोषणा पाण्यात वाहून जातात. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे किंवा नागपूर, शहर कोणतेही असो; काही तासांच्या पावसानंतर चित्र जवळपास सारखेच दिसते. रस्ते जलमय होतात, सखल भाग पाण्याखाली जातात, घरांमध्ये सांडपाणी शिरते, वाहतूक ठप्प होते आणि नव्याने बांधलेले रस्ते उखडू लागतात. त्यानंतर प्रशासनाचा नेहमीचा बचाव पुढे येतोअतिवृष्टीमुळे ही परिस्थिती निर्माण झाली. मात्र नागरिकांच्या दृष्टीने हा पावसाचा नव्हे, तर भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि नियोजनशून्य कारभाराचा महापूर आहे.

दरवर्षी नालेसफाईच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा खर्च दाखवला जातो. रस्ते, गटारे, पूल आणि पर्जन्यजल निचरा व्यवस्थेवर हजारो कोटी रुपयांच्या विकासकामांचा दावा केला जातो. मात्र पहिल्याच मुसळधार पावसात नाले तुंबतात, रस्ते खचतात आणि शहरांची वाहतूक व्यवस्था कोलमडते. जर कामे दर्जेदार आणि नियोजनबद्ध झाली असती, तर ही परिस्थिती वारंवार निर्माण झाली नसती. त्यामुळे सार्वजनिक पैशांचा वापर नेमका कुठे झाला, हा प्रश्न अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

यामागे निकृष्ट दर्जाची कामे, कंत्राटी व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि कामांच्या गुणवत्तेवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची निष्क्रियता हेच प्रमुख कारण असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. अनेक ठिकाणी कामे कागदावर पूर्ण दाखवली जातात; प्रत्यक्षात मात्र गटारे अपुरी, नाले अर्धवट स्वच्छ आणि रस्त्यांची गुणवत्ता अत्यंत खराब असल्याचे वास्तव प्रत्येक पावसाळ्यात उघडे पडते.

सध्या नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. रस्ते खोदले गेले आहेत, भुयारी गटारांची कामे अनेक ठिकाणी अपूर्ण आहेत आणि वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. शहर विकासाच्या प्रक्रियेत असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात समन्वयाचा अभाव आणि नियोजनातील त्रुटी स्पष्टपणे दिसून येत आहेत. पहिल्याच पावसात अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने सुरू असलेल्या कामांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे या अपयशाची जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही तयार नसते. अधिकारी हवामानाला दोष देतात, लोकप्रतिनिधी अधिक निधीची मागणी करतात, तर कंत्राटदार पुढील निविदांच्या तयारीत व्यस्त असतात. प्रत्येक मोठ्या घटनेनंतर चौकशी समित्यांची घोषणा होते, अहवाल तयार होतात; मात्र दोषींवर ठोस कारवाई झाल्याची उदाहरणे अत्यंत दुर्मिळ आहेत. परिणामी निकृष्ट कामे करणाऱ्यांचे मनोबल वाढते आणि सार्वजनिक पैशांची उधळपट्टी कायम राहते.

शहर नियोजनाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे पर्जन्यजल निचरा व्यवस्था. मात्र अनेक शहरांमध्ये नैसर्गिक नाले बुजवून बांधकामे करण्यात आली आहेत. अतिक्रमणे हटविण्याऐवजी त्यांना राजकीय संरक्षण मिळते. परिणामी पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडतो आणि काही तासांच्या पावसातच पूरस्थिती निर्माण होते. हवामान बदलामुळे पावसाची तीव्रता वाढत असल्याचे शास्त्रज्ञ सातत्याने सांगत आहेत. त्यामुळे भविष्यातील परिस्थिती लक्षात घेऊन शहरे तयार करण्याची गरज असताना प्रशासन अजूनही जुन्याच पद्धतीने काम करत असल्याचे दिसून येते.

नाशिकमध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक नव्हे, तर जागतिक स्तरावर लक्ष वेधणारा कार्यक्रम आहे. लाखो भाविक शहरात येणार असताना रस्ते, निचरा व्यवस्था, वाहतूक आणि मूलभूत सुविधा सक्षम असणे आवश्यक आहे. जर आजच पावसामुळे शहराची अवस्था बिकट होत असेल, तर कुंभमेळ्याच्या काळात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ कामे सुरू असल्याचे दाखवून चालणार नाही; ती वेळेत, दर्जेदार आणि सुरक्षित पद्धतीने पूर्ण होणे अत्यावश्यक आहे.

आता केवळ निलंबनाच्या घोषणा किंवा चौकशी समित्या स्थापन करून परिस्थिती बदलणार नाही. निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकणे, संबंधित अभियंते आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करणे, सार्वजनिक निधीची वसुली करणे आणि प्रत्येक प्रकल्पाचे स्वतंत्र तांत्रिक लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. तसेच विकासकामांची माहिती, खर्च आणि गुणवत्ता तपासणीचा अहवाल सार्वजनिक करण्याची पारदर्शक व्यवस्था निर्माण झाली पाहिजे.

पाऊस हा नैसर्गिक आहे; पण दरवर्षी होणारी प्रशासनाची अपयशाची पुनरावृत्ती नैसर्गिक नाही. नागरिक कर भरतात ते सुरक्षित रस्ते, सक्षम पायाभूत सुविधा आणि उत्तरदायी प्रशासनासाठी. जर प्रत्येक पावसाळ्यानंतर त्यांनाच जीव, मालमत्ता आणि रोजच्या जगण्याचा फटका सहन करावा लागत असेल, तर विकासाच्या दाव्यांचा अर्थच उरत नाही.

आज गरज आहे ती हवामानाला दोष देण्याची नाही, तर भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि उत्तरदायित्वाच्या अभावावर कठोर कारवाई करण्याची. अन्यथा दरवर्षी वाहून जाणार ते केवळ डांबरी रस्ते किंवा पूल नसतील, तर जनतेचा शासनव्यवस्थेवरील उरलेलाही विश्वास असेल.

## संपादकीय

### भाजपने धर्माच्या नावावर सगळेच लुटले!

लोकशाहीत सत्ता ही जनतेची विश्वस्त असते; मालक नाही. मंदिरं ही श्रद्धेची केंद्रं आहेत. रिअल इस्टेट प्रकल्प नाहीत. धर्म हा नैतिकतेचा मार्ग आहे. संपत्ती मिळवण्याचं साधन नाही. जोपर्यंत सत्ताधारी या मूलभूत तत्त्वांचा विसर पडू देतील, तोपर्यंत जनतेच्या मनातून लुटल्याची हाक येत राहील.

दिखाव्याची श्रद्धा, साम-दाम-दंड-भेद सोबत कलयुगातील ईडी-सीबीआय-आयटी-निवडणूक आयोग-न्यायालये या सगळ्यांचा वापर करून मिळवलेली सत्ता आणि सत्तेचा दुरुपयोग करून जमिनींच्या गैरव्यवहाराने आणि मंदिरातील जनतेने दिलेलं दान लुटणाऱ्या टोळ्यांना पाठीशी घालणाऱ्या राजकारणाचा काळा चेहरा म्हणजे भाजप, हीच भाजपची ओळख झाली आहे.

भारतीय समाजात धर्म हा श्रद्धेचा विषय आहे. गेल्या काही वर्षांत मात्र तो राजकारण, सत्ता आणि अब्जावधी रुपयांच्या जमीन व्यवहारांचा विषय बनला आहे. एकीकडे मंदिरांच्या नावावर भावना चेतवल्या जातात, तर दुसरीकडे त्याच मंदिरांच्या परिसरातील जमिनी, देणग्या आणि सरकारी मालमत्ता यांच्याभोवती गंभीर प्रश्न उभे राहतात. त्यामुळे एक प्रश्न अधिक तीव्र होतो- धर्म हा श्रद्धेचा मार्ग आहे की सत्ताधाऱ्यांसाठी संपत्ती निर्माण करण्याचं साधन?

गेल्या दशकात भारतीय जनता पक्षाने स्वतःला हिंदुत्वाचा सर्वात मोठा पुरस्कर्ता म्हणून उभं केलं. राम मंदिरापासून महाकाल, काशी विश्वनाथ ते केदारनाथपर्यंत धार्मिक स्थळांच्या विकासाची मोठी घोषणा झाली. परंतु याच काळात अनेक धार्मिक आणि सार्वजनिक जमिनींच्या व्यवहारांवर गंभीर आरोप झाले. हे आरोप न्यायालयात, तपास यंत्रणांकडे किंवा राजकीय वादाच्या स्वरूपात विविध टप्प्यांवर आहेत. अनेक प्रकरणांमध्ये अंतिम न्यायालयीन निष्कर्ष अद्याप आलेले नाहीत. तरीही या आरोपांनी सार्वजनिक चर्चेत मोठं स्थान मिळवलं आहे.

राम के नाम पे दे दे बाबा,
भाजप के चपरासी लुटना चाहते है!

अयोध्येतील राम मंदिर परिसरातील जमीन व्यवहार हा त्यातील सर्वात गाजलेला विषय ठरला. काही जमिनी अत्यल्प किमतीत विकत घेऊन काही मिनिटांत किंवा काही दिवसांत अनेक पटीने वाढलेल्या किमतीत मंदिर ट्रस्टला विकल्याचे आरोप झाले. या व्यवहारांमुळे श्रद्धाळूंनी दिलेल्या देणग्यांच्या पैशाचा उपयोग नेमका कोणाच्या फायद्यासाठी झाला, हा प्रश्न उपस्थित झाला. नजूल जमिनींच्या व्यवहारांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं. या सर्व आरोपांमुळे मंदिर उभारणीसारख्या ऐतिहासिक प्रकल्पावरही संशयाचं सावट पडलं. राम मंदिरातील देणगी व्यवस्थापनावरही प्रश्न उपस्थित झाले. देणगी मोजणी प्रक्रियेतील कथित अनियमितता, पारदर्शकतेचा अभाव आणि देखरेखीतील त्रुटींविषयी विविध दावे समोर आले. श्रद्धाळू देवासाठी दान देतात, कोणत्याही व्यक्ती, दलाल किंवा राजकीय व्यवस्थेसाठी नाहीत. त्यामुळे अशा प्रत्येक आरोपामुळे जनतेचा विश्वास हादरतो.

भाजपने महाकाल को भी नहीं छोडा!
बोलो हर हर महादेव!

मध्य प्रदेशातील उज्जैन येथील महाकाल मंदिर परिसरातील जमीन व्यवहारांवरही गंभीर आक्षेप नोंदवले गेले. मंदिर परिसरातील सरकारी जमिनींचं खासगीकरण करून त्या व्यावसायिक प्रकल्पांसाठी उपलब्ध करून दिल्याचे आरोप झाले. लाखो भाविकांच्या श्रद्धेचं केंद्र असलेल्या परिसरात पंचतारांकित हॉटेल उभारण्याच्या चर्चेमुळे हा वाद अधिक तीव्र झाला. मंदिर विकासाच्या नावाखाली व्यावसायिक विकासाला प्राधान्य दिलं जात असेल, तर तो विकास नसून श्रद्धेचं व्यापारीकरण आहे, अशी टीका झाली.

**महाराष्ट्रातही जमीन लुटारूंची टोळी**

महाराष्ट्रातही चित्र फार वेगळं नाही. मुंबईतील मोठ्या भूखंडांच्या पुनर्वर्गीकरणापासून पुण्यातील जमीन व्यवहारांपर्यंत अनेक प्रकरणांमध्ये सत्ताधाऱ्यांवर प्रश्न उपस्थित झाले. विकास आराखड्यातील बदल, टीडीआरचे व्यवहार, पर्यावरणीय मर्यादा शिथिल करणे आणि बिल्डरांना लाभदायक निर्णय अशा अनेक मुद्द्यांवर महायुती सरकारवर विरोधकांनी गंभीर आरोप केले. ग्रामीण भागात भूमाफियांनी महसूल यंत्रणेशी संगनमत करून शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्याच्या घटनाही सातत्याने समोर येत आहेत.

भाजपने ना खाऊंगा, ना खाने
दूंगा, मगर लुटुंगा!

भाजप नेहमी काँग्रेसवर भ्रष्टाचाराचे आरोप करत आला. ना खाऊंगा, ना खाने दूंगा ही घोषणा जनतेसमोर ठेवली गेली. पण प्रत्यक्षात सत्तेच्या काळात धार्मिक ट्रस्ट, सरकारी जमीन, वनजमीन, सार्वजनिक मालमत्ता आणि बिल्डर लॉबीभोवती निर्माण झालेले प्रश्न पाहता, या घोषणेची विश्वासार्हता कमी झाल्याची भावना अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याचा दावा करणाऱ्या पक्षावरच अशा स्वरूपाचे आरोप वारंवार होणं ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. ना खाऊंगा, ना खाने दूंगा, बोलुंगा और लुटुंगा! हा भाजपचा नवा नारा झाला आहे.

# पहिल्याच पावसात रावेत-किवळे परिसरातील विकासाचा फुगा फुटला

## महावितरण व महापालिकेविरोधात श्रीराम चौकात रहिवाशांकडून आंदोलन.. पोलिसांनी नागरिकांना दमदाटी केल्याचा आरोप

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**रावेत :** पहिल्याच जोरदार पावसाने रावेत, किवळे, मामुर्डी, गहुंजे आणि विकासनगर परिसरातील पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने रहिवाशांचे मोठे नुकसान झाले, तर वीजपुरवठा खंडित आणि पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने हजारो नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.

या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी श्रीराम चौकात एकत्र येत महावितरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत निषेध आंदोलन केले. लोकवस्ती झपाट्याने वाढत असतानाही स्वतंत्र वीज उपकेंद्र, सक्षम पावसाळी जलनिस्सारण व्यवस्था, दर्जेदार रस्ते आणि पुरेशा पाणीपुरवठ्यासाठी प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

बिल्डरांनी आकर्षक आश्वासने देऊन घरे विकली; मात्र प्रत्यक्षात नागरिकांना प्रत्येक पावसाळ्यात पाणी साचणे, अंधार, पाणीटंचाई आणि वाहतुकीच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला. परिसरात स्वतंत्र वीज केंद्र नसल्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत असल्याचेही आंदोलकांनी सांगितले.



आंदोलनादरम्यान रावेत पोलिसांनी नागरिकांना दमदाटी केल्याचा आरोपही करण्यात आला. शांततेत आंदोलन करणाऱ्या नागरिकांशी संवाद साधण्याऐवजी दबाव टाकण्यात आल्याने उपस्थितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. समस्या मांडण्यासाठी जमलेल्या नागरिकांशी गुन्हेगारांसारखी वागणूक दिल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

दरम्यान, वीज आणि पाणी प्रश्नावर नागरिक रस्त्यावर उतरले असतानाही अनेक लोकप्रतिनिधी आंदोलनापासून दूर राहिल्याने उपस्थितांनी संताप व्यक्त केला.

निवडणुकीत आश्वासनांचा वर्षाव करणारे नेते संकटाच्या काळात नागरिकांसोबत दिसत नसल्याची टीका करण्यात आली. परिसरासाठी स्वतंत्र वीज केंद्र उभारून मूलभूत सुविधांचा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला.

# मुसळधार पावसात पिंपरी-चिंचवडमध्ये इमारत कोसळली; १५ जण अडकल्याची भीती

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी-चिंचवड :** पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमध्ये बुधवारी मोठी दुर्घटना घडली. मोशी येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प परिसरातील प्रशासकीय इमारतीचा काही भाग अचानक कोसळल्याने सुमारे १५ ते १६ जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) तसेच इतर आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असून रुग्णवाहिकाही घटनास्थळी तैनात करण्यात आल्या आहेत. सततच्या मुसळधार पावसामुळे इमारत कोसळल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त केली जात असली,

तरी दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीकडे लक्ष देण्याचे आवाहन केले असून बचावकार्य पूर्ण झाल्यानंतरच अडकलेल्यांची आणि जीवितहानीची अधिकृत माहिती जाहीर करण्यात येणार आहे.



# आळंदीत वारकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा; डॉ. बाबा कांबळे यांचा सत्याग्रह मागे

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी-चिंचवड :** आळंदीतील वारकऱ्यांच्या समस्या, दलित व मागासवर्गीय दिंड्यांची गैरसोय तसेच धर्मशाळेच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी जाहीर करण्यात आलेले सत्याग्रह आंदोलन डॉ. बाबा कांबळे यांनी मागे घेतले आहे. भोसरीचे आमदार महेश लांडगे, आळंदी नगरपरिषदेचे अधिकारी, पोलीस प्रशासन आणि नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर प्रशासनाने पालखी सोहळ्यापूर्वी वारकऱ्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन दिले.

डॉ. बाबा कांबळे यांनी पूरपरिस्थिती आणि वारकऱ्यांची गैरसोय लक्षात घेऊन आंदोलनाऐवजी प्रशासनाला सहकार्य करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. पालखी सोहळा शांततेत आणि भक्तिमय वातावरणात पार पडावा, तसेच समाजकंटकांना संधी मिळू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, धर्मशाळेचे पावित्र्य, वारकऱ्यांचा सन्मान आणि दलित दिंड्यांवरील अन्यायाविरोधातील कायदेशीर लढा सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार महेश लांडगे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे आणि आळंदी प्रशासनाचे त्यांनी आभार मानले.

# संततधार पावसामुळे शहरातील वाहतूक विस्कळीत; अपघाताचा धोका वाढला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**काळेवाडी :**पुणे : शहरात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे वाहतूक विस्कळीत झाल्याचे चित्र शनिवारी (दि. ४) दिसून आले. शहरातील सर्वच मुख्य, उपमुख्य रस्त्यांवर पावसाचे पाणी साचल्याने त्यातून मार्ग काढताना वाहनधारकांचे, विशेषतः दुचाकीस्वारांचे हाल होताना दिसून आले. पावसामुळे वाहनांचा वेग मंदावल्याने शहरात सर्वत्र वाहतूककोंडी दिसून आली. दरम्यान, शुक्रवारी सकाळी ७ वाजेपासून शनिवारी दुपारी १२ वाजेपर्यंत शहरात झाडपडीच्या २९ घटना घडल्याची माहिती अग्निशामक विभागाकडून देण्यात आली.



शनिवारी सुटीचा दिवस असल्याने शहरातील रस्त्यांवर वाहतूककोंडी होणार नाही, असे वाटत असताना पर्यटनासाठी, शहरात फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडलेल्या वाहनांमुळे मोठी कोंडी झाली. सिंहगड रोड, डेक्कन, शिवाजीनगर, नळस्टॉप, लॉ कॉलेज रोड, कर्वे रोड, पुणे-अहिल्यानगर रोड, पुणे-सोलापूर रोड, स्वारगेट, वाकडेवाडी, बाजीराव रोड, शिवाजी रोड, जंगली महाराज रोड, फर्ग्युसन कॉलेज रोड यासह शहरातील उपनगरांमध्येही मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी दिसून आली. रस्त्यांवरील खड्डे आणि त्यात साचलेले पाणी, बेशिस्त पार्किंग यामुळे या कोंडीत अधिक भर पडली.

शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर पावसाचे पाणी तासन्तास साचून राहिल्याने पाण्याचा निचरा होत नसल्याचे दिसून आले. पाण्याखाली गेलेले खड्डे दिसत नसल्याने दुचाकीस्वारांना जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत होती. शहरात मान्सूनपूर्व नालेसफाई, खड्डे बुजवणे, धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी आणि वाहतूक नियोजन प्रभावीपणे झाले असते, तर सध्या सर्वत्र दिसणारी वाहतूककोंडी दिसली नसती, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

# महापालिकेच्या महसूलवाढीबरोबरच पायाभूत सुविधा आणि पर्यावरणपूरक विकासकामांना स्थायी समितीची मंजुरी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी - चिंचवड** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची बैठक आज स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत महापालिकेचे उत्पन्न वाढविणे, शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे, आरोग्य सेवांचा दर्जा उंचावणे, पर्यावरणपूरक धोरणांना चालना देणे तसेच नागरिकांना अधिक गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने २७ महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच स्थायी समिती सदस्य आणि विविध विभागप्रमुख उपस्थित होते. बैठकीत शहरातील ८० उड्डाणपूल व भुयारी मार्गांवरील जाहिरात हक्क १० वर्षांच्या कालावधीसाठी ई-लिलावाद्वारे अधिकतम दर देणाऱ्या निविदाधारकांना देण्यास मान्यता देण्यात आली. जुना मुंबई-पुणे महामार्ग, औंध-रावेत बीआरटी मार्ग तसेच मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील जाहिरात हक्क निश्चित करण्यात आले असून यामुळे महापालिकेला दीर्घकालीन महसूल प्राप्त होणार आहे.

याचबरोबर शहरातील १५ हजारांहून अधिक विद्युत पोलांवर किऑस्क जाहिराती उभारण्यासाठी सहा क्षेत्रीय कार्यालयांतील निविदांना मंजुरी देण्यात आली. तसेच १८ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवरील दिशादर्शक फलकांवर जाहिरात हक्क देण्यासही मान्यता देण्यात आली. या सर्व जाहिरात माध्यमांमधून महापालिकेच्या कायमस्वरूपी उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांमधील संगणक यंत्रणांची देखभाल व दुरुस्ती अखंडित सुरू राहावी यासाठी विद्यमान एजन्सी मे. झुम कॉम्प्युटर्स यांना नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ३० एमबीपीएस इंटरनेट लीज्ड लाईन तसेच मंत्रालयाशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क राखण्यासाठी ४ एमबीपीएस पॉइंट-टू-पॉइंट लाईन भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) मार्फत उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील शवागारामधील अत्याधुनिक कोल्ड स्टोरेजच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती (अचउ) खर्चालाही मान्यता देण्यात आली, ज्यामुळे शवागारातील सुविधा अधिक सक्षम व सुरळीत राहणार आहेत.

महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध राहावे यासाठी एकूण ३७ वाहनचालक कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. यामध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, नवीन भोसरी, सांगवी, यमुनानगर, थेरगाव, तालेरा, आकुर्डी आणि जिजामाता रुग्णालयांचा समावेश आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील संभाजीनगर येथे स्टॉर्म वॉटर लाईन उभारण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली. तसेच अर्बन स्ट्रीट डिझाईन पद्धतीने विकसित करण्यात आलेल्या पदपथांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामालाही मंजुरी देण्यात आली.

समाज विकास विभागामार्फत एचआयव्ही/एड्स बाधित पात्र लाभार्थ्यांना पीएमपीएमएलचे मोफत बस पास उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला. या योजनेंतर्गत नव्या व नूतनीकरण केलेल्या शेकडो लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

महापालिकेच्या उर्दू माध्यम बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षणांतर्गत लेखन साहित्य खरेदीस मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्रमांक १८ चिंचवड परिसरातील मिसिंग लिंक व इतर रस्ते विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

पर्यावरण अभियांत्रिकी विभागांतर्गत चऱ्होली येथील टप्पा-१ व टप्पा-२ मैलाशुद्धीकरण केंद्राच्या तीन वर्षांच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीच्या कामास मंजुरी देण्यात आली. तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रांमधून प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराला चालना देण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार जलनिःसारण जोडणी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

महापालिकेच्या नवीन 'ज' (लोहगड) आणि 'ल' (रायगड) क्षेत्रीय कार्यालयांसाठी आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

जलनिःसारण विभागांतर्गत प्रभाग क्रमांक ११ व १२ मधील जलनिःसारण नलिका, चेंबर्सची देखभाल-दुरुस्ती तसेच 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तांत्रिक सेवा प्रदात्यांनी सुचविलेल्या जलनिःसारण विषयक कामांना मंजुरी देण्यात आली. या कामांमुळे पावसाळ्यातील पाणी तुंबण्याच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना होण्यास मदत होणार आहे.

अग्निशमन विभागासाठी अत्यावश्यक सेवांमध्ये वापरले जाणारे अत्याधुनिक स्मार्ट गार्ड कटर उपकरण खरेदीस मंजुरी देण्यात आली. या उपकरणामुळे आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य अधिक वेगाने आणि परिणामकारकपणे करता येणार आहे.

बीआरटी कॉरिडॉर क्रमांक ३ वरील रेलिंग दुरुस्ती तसेच बसस्टॉपच्या वार्षिक देखभाल-दुरुस्तीच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

शहरातील स्वच्छ व पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी पारंपरिक इंधनावरील रिक्षांचे ई-रिक्षामध्ये रूपांतर (रेट्रोफिटिंग) करणाऱ्या वाहनधारकांनाही प्रति रिक्षा ३० हजारांचे अनुदान देण्याची शिफारस महापालिका सभेकडे करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दापोडी येथील नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र तलाठी कार्यालय सुरू करण्यासाठी महापालिकेच्या गाळ्याची जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

याशिवाय, विविध विभागांतील निविदा, पायाभूत सुविधा विकास, आरोग्य सेवा, जलनिःसारण व्यवस्था, पर्यावरण संवर्धन, कार्यालयीन सुविधा, सामाजिक कल्याणकारी योजना आणि महापालिकेच्या महसूलवाढीस चालना देणाऱ्या विविध विषयांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# ‘आयटी’ क्षेत्रातील मनुष्यबळाच्या समस्यांवर ‘व्हाइट टी-शर्ट रिव्होल्युशन’चे राज्यव्यापी सर्वेक्षण अभियान

## कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांच्या समस्या देशाच्या उत्पादकतेशी संबंधित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या समस्या या केवळ कामाच्या ठिकाणापुरत्या मर्यादित नसून त्या देशाच्या उत्पादकतेशी, अर्थव्यवस्थेशी आणि सामाजिक न्यायाशी संबंधित आहेत. त्यामुळे कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी ‘व्हाइट टी-शर्ट रिव्होल्युशन’ या सामाजिक संस्थेने सुरू केलेले राज्यव्यापी सर्वेक्षण अभियान महत्त्वाचे आहे, असे मत ज्येष्ठ काँग्रेस नेते व सामाजिक कार्यकर्ते गोपाळदादा तिवारी यांनी व्यक्त केले.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी संस्थेच्या वतीने क्यूआर कोडच्या माध्यमातून ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

जागतिक पातळीवर भारतीय सॉफ्टवेअर अभियंत्यांच्या रोजगाराच्या संधींवर परिणाम होत असून, अनेक कंपन्यांमध्ये सुरू असलेल्या नोकरकपातीमुळे रोजगार सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अलीकडील काळात मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांकडून करण्यात आलेल्या कर्मचारी कपातीच्या पार्श्वभूमीवर ‘कॉर्पोरेट न्याय’ हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक आणि आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. कामाच्या ठिकाणी येणारा मानसिक ताण, वाढते कामाचे तास, रोजगारातील अस्थिरता, पगारातील अनिश्चितता, काम-जीवन समतोलाचा अभाव, महिलांसमोरील आव्हाने तसेच रोजगार धोरणांमधील त्रुटी यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत.

‘व्हाइट टी-शर्ट रिव्होल्युशन’चे संस्थापक ऋत्विक धनवट यांनी उपक्रमाची संकल्पना आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. कॉर्पोरेट क्षेत्रातील लाखो कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. काही महिन्यांपूर्वी संस्थेच्या वतीने मुठा नदीपात्र स्वच्छता अभियान राबविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

संस्थापक सदस्य आशुतोष प्रदीपराव पवार यांनी कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रकाश टाकला. वाढत्या नोकरकपातीमुळे निर्माण झालेली असुरक्षितता, मानसिक आरोग्याच्या समस्या, दीर्घ कामाचे तास आणि रोजगार धोरणांतील बदल यांचा कर्मचाऱ्यांच्या जीवनावर मोठा परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्वेक्षणाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचा आवाज थेट लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवून आवश्यक धोरणात्मक बदल घडवून आणण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले की, कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांच्या समस्या या केवळ वैयक्तिक स्वरूपाच्या नसून त्यांचा परिणाम कुटुंब, समाज आणि देशाच्या आर्थिक प्रगतीवर होतो. त्यामुळे या विषयाकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

यावेळी व्हाइट टी-शर्ट रिव्होल्युशनचे सदस्य सिद्धांत जांभुळकर, अक्षय कांबळे, स्वप्नील शेळके आणि पवन खरात उपस्थित होते. ‘कॉर्पोरेट न्याय’ उपक्रमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात येणाऱ्या शिफारसी महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनातील लोकप्रतिनिधींसमोर मांडण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## सारांश वृत्त

### अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी आरोपीला २० वर्षांची सक्तमजुरी; १ लाख रुपयांचा दंडही ठोठावला



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर :** अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी इंदापूर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी हर्षनंदन बळीराम सोनवणे (वय २७, रा. शेटफळगडे, ता. इंदापूर) याला २० वर्षे सक्तमजुरी व विविध कलमांन्वये एकूण एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांनी हा निकाल दिला.

भिगवण पोलिस ठाण्यात पीडितेच्या आजीने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीने पीडितेला घराजवळील गोठ्याजवळ बोलावून तिचा विनयभंग केला होता. पीडिता आरडाओरडा करताच तिची आजी घटनास्थळी पोहोचली. त्यावेळी आरोपीने तिला धक्का देत तेथून पलायन केले. त्यानंतर कुटुंबीयांनी विश्वासात घेतल्यानंतर पीडितेने आरोपीने जिवे मारण्याची धमकी देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची माहिती दिली. यानंतर गुन्ह्यात भारतीय दंड विधान कलम ३७६ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (पॉक्सो) कायद्यांतर्गत गंभीर कलमांचा समावेश करण्यात आला. या प्रकरणाचा तपास भिगवण पोलिस ठाण्याचे तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक शेख यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. घटनेच्या वेळी पीडिता अवघी १३ वर्षे ४ महिन्यांची होती. पीडिता, तिची आई, आजी आणि इतर साक्षीदारांचे जबाब तसेच सादर करण्यात आलेला पुरावा महत्त्वाचा ठरला. विशेष सरकारी वकील पी. जी. जोशी यांनी सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. त्यानंतर न्यायालयाने आरोपीला बलात्कार व पॉक्सो कायद्याअंतर्गत २० वर्षे सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंड, भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्वये पाच वर्षे सक्तमजुरी व २५ हजार रुपये दंड, तसेच कलम ४५२ अन्वये तीन वर्षे सक्तमजुरी व २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. या खटल्यात भिगवण पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी निश्चल शितोळे व पैरवी अधिकारी पोलिस अंमलदार गोरख कस्पटे यांनी सरकार पक्षाला सहकार्य केले.

## सततच्या पावसाने शेती पिकांचे मोठे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यासह पूर्व भागात गेल्या पाच-सहा दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतीच्या कामांवर मोठा परिणाम झाला आहे. मेंगडेवाडी, जारकरवाडी, निरगुडसर, लाखणगाव, पोंदेवाडी, पारगाव, शिंगवे, लोणी, धामणी, मांदळेवाडी, वडगावपीर, रानमळा, वाळूंजनगर, खडकवाडी, शिरदाळे आणि पहाडदरा परिसरात सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांची शेतीची कामे ठप्प झाली आहेत.

अनेक ठिकाणी शेतांना तळ्याचे स्वरूप आले असून त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. धामणी येथील जाधव-बढेकर मळ्यातील शेतकरी समीर रखाराम बढेकर यांच्या दोन एकर क्षेत्रातील गोल्डन मक्याचे पीक पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. तोडणीस आलेली गोल्डन मक्याची कणसे महिला व पुरुष मजूर कंबरेएवढ्या पाण्यात उतरून तोडत असून, ती जवळपास शंभर फूट अंतर पाण्यातून वाहून सुरक्षित ठिकाणी आणत आहेत.

सततच्या पावसामुळे गोल्डन मक्याच्या कणसांच्या बाजारभावातही घसरण झाल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे पिकांचे नुकसान आणि दुसरीकडे भावघसरण, अशा दुहेरी संकटाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे.

## लोणी-वाफगाव घाटात अतिवृष्टीमुळे झाडे उन्मळून पडली; मातीचा मलबा रस्त्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** गेल्या पाच-सहा दिवसांपासून पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका सर्वदूर बसत असून, आंबेगाव तालुक्यातून खेड तालुक्याला जोडणाऱ्या महत्त्वाच्या लोणी-वाफगाव मार्गावरील शिकोजीबाबा घाटात बुधवारी (दि. ८) सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास अतिवृष्टीमुळे दरडीसदृश भाग कोसळून मोठ्या प्रमाणात मातीचा मलबा रस्त्यावर आला. तसेच अनेक झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीस मोठा धोका निर्माण झाला.

ही घटना शिरदाळे येथील युवक आदिनाथ तांबे हे अभ्यासाच्या निमित्ताने लोणीकडे जात असताना त्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तातडीने शिरदाळे गावचे माजी उपसरपंच मयूर सरडे यांना घटनेची माहिती दिली.

त्यानंतर सरडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी प्रथमेश लोंढे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.

घटनेची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ जेसीबी व आवश्यक यंत्रसामग्री घटनास्थळी पाठवली. अवघ्या एका तासाच्या आत रस्त्यावरील मलबा हटवून वाहतूक सुरळीत करण्यात आली. दरम्यान, परिसरात अद्यापही मुसळधार पाऊस सुरू असल्याने अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी घाटमाथा आणि दरडप्रवण भागातून प्रवास करताना अत्यंत सावधगिरी बाळगावी व शक्यतो अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी प्रथमेश लोंढे यांनी केले आहे.

## आंबेगाव तालुक्यात पावसाचा हाहाकार; घोड नदीला पूर, अनेक मार्ग ठप्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यात मुसळधार पावसाने बुधवारी अक्षरशः कहर केला. मंगळवारी सायंकाळपासून सुरू झालेल्या पावसाचा जोर दिवसभर कायम राहिल्याने तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. ओढे, नाले आणि छोटे प्रवाह दुथडी भरून वाहू लागले असून घोड नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने नदीला पूर आला आहे. नदीकाठच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पूरस्थितीमुळे नदीलगतची शेती, स्मशानभूमी आणि दशक्रिया विधीचे घाट पाण्याखाली गेले आहेत. अनेक सखल भागांत पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने नदीपात्राजवळ न जाण्याचे आणि पाण्याचा प्रवाह ओलांडण्याचा प्रयत्न न करण्याचे आवाहन केले आहे.

सततच्या पावसाचा मोठा फटका शेतीला बसला आहे. तालुक्यातील अनेक शेतांमध्ये पाणी शिरल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. भात, भुईमूग, सोयाबीन, भाजीपाला तसेच चाऱ्याच्या पिकांचे नुकसान झाले असून काही ठिकाणी माती वाहून गेल्याने शेतजमिनीची धूप झाली आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास नुकसानीत आणखी वाढ होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

निरगुडसर परिसरातील जवळे येथील नदी पुलावर पाणी आल्याने वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद झाली. वाहनांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागला. तसेच बेल्हा-जेजुरी महामार्गावरील लाखणगाव येथील नदी पुलावरून पाणी वाहू लागल्याने खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने वाहतूक थांबवली. पोलिसांनी दोन्ही बाजूंनी बॅरिकेड्स लावून वाहनांना रोखले. दरम्यान, तालुक्यातील घाटरस्त्यांवर पावसामुळे झाडे उन्मळून पडणे, माती व दगड रस्त्यावर येणे अशा घटना घडल्या. त्यामुळे काही मार्गांवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. पावसाचा वाढता जोर आणि नदीची पाणीपातळी लक्षात घेता प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, नदीकाठच्या भागात विशेष खबरदारी घ्यावी तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने पुढील काही तासांतही जोरदार पावसाची शक्यता व्यक्त केल्याने प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली आहे. ग्रामीण भागातील वाहतूक, बाजारपेठा आणि दैनंदिन व्यवहारांवरही पावसाचा मोठा परिणाम झाला आहे.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जुन्नर, आंबेगावमधील पर्यटनस्थळांवर बंदी, प्रांताधिकाऱ्यांचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** जुन्नर व आंबेगाव तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बंदी घालण्यात आली आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून होत असलेल्या जोरदार पावसामुळे धबधबे, घाटमाथा, गडकिल्ले आणि अन्य पर्यटनस्थळांवर दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन ही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे, अशी माहिती जुन्नरच्या प्रांताधिकारी अर्चना तांबे यांनी दिली.

जुन्नर तालुक्यातील आंबोली धबधबा (दऱ्याघाट), माळशेज घाट, कांचन धबधबा (हातवीज), रिव्हर्स वॉटरफॉल (नाणेघाट), किल्ले शिवनेरी, चावंड, जीवधन, हडसर, निमगिरी, आहुपे, डिंभे धरण, पोखरी घाट तसेच आंबेगाव तालुक्यातील भीमाशंकर आणि कोंढवळ धबधबा या पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. या आदेशानुसार वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे किंवा पोहणे, धबधब्याखाली जाणे किंवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे, धोकादायक ठिकाणी सेल्फी अथवा चित्रीकरण करणे, मद्यपान करून अथवा मद्य बाळगून पर्यटनस्थळी प्रवेश करणे, धोकादायक ठिकाणी वाहने उभी करणे, बेदरकार वाहन चालवणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, महिलांची छेड काढणे, मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपक, डीजे किंवा वाहनांवरील स्पीकर वाजविणे तसेच ध्वनी, वायू आणि जलप्रदूषण होईल अशा कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे. याशिवाय धबधबे, धरणे व नदी परिसरात सर्व प्रकारच्या दुचाकी, चारचाकी व इतर वाहनांच्या प्रवेशावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. प्रशासनाने नागरिक आणि पर्यटकांना अधिसूचनेतील आदेशांचे काटेकोर पालन करून स्वतःची व इतरांची सुरक्षितता जपण्याचे आवाहन केले आहे. आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे तांबे यांनी स्पष्ट केले.

## सिंहगड रोडच्या एकतानगरीमधील सीमाभिंत बांधण्याचे काम अपूर्णच; आज सकाळी पाणी शिरल्याने नागरिकांची प्रशासनाबद्दल नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** मुठा नदीला पूर आल्यानंतर सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी येथे पाणी घुसू नये यासाठी सीमाभिंत बांधण्याचे काम सुरू आहे. पावसाळा सुरू होऊन दोन महिने झाले तरी या सीमाभिंतीचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. आतापर्यंत केवळ ७० टक्के काम झाले आहे. या परिसरात आज सकाळी सुद्धा पाणी शिरल्याने नागरिकांनी पालिका प्रशासनाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

गेल्या काही वर्षांपासून एकतानगरीतील अनेक इमारतींमध्ये पुराचे पाणी घुसत असल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्या भागात मुख्यमंत्र्यांपासून अनेक मंत्र्यांनी भेट देऊन जागापाहणी केली आहे. त्या भागातील नागरिकांना सुरक्षेसाठी विश्वास देण्यात आला असला तरी, अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. जानेवारी महिन्यात तातडीचे काम म्हणून मुठा नदीच्या बाजूने सीमाभिंत बांधण्यासाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी परवानगी दिली होती. त्यानंतर मलनिःसारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराकडून काम करवून घेणे अपेक्षित होते. मे महिन्यापर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, एकतानगरी भागात काहीच काम झालेले नव्हते. पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी त्या ठिकाणी पाहणी केल्यानंतर संबंधित अधिकारी व ठेकेदारीची पोलखोल झाली होती. नंतर हे काम का झाले नाही, यावरून झाडाझडती घेण्यात आली.

त्यानंतर पुढील दोन महिन्यांत हे काम पूर्ण झाले पाहिजे, अन्यथा कारवाई केली जाईल, अशी तंबी दिली होती. त्यानंतर या सीमाभिंतीच्या कामाला सुरुवात झाली; पण आतापर्यंत केवळ ७० टक्केच काम पूर्ण झाले आहे.

गेल्या सहा दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे खडकवासला धरण १०० टक्के भरले आहे. त्यामुळे धरणातून २७ हजार क्युसेक पाणी सोडले आहे. एकतानगरी, निंबजनगर या भागांत पाणी शिरले. त्यामुळे या सीमाभिंतीचे काम पालिकेने पावसाळ्यापुर्वी का पूर्ण केले नाही, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. मुठा नदीच्या बाजूने सीमाभिंत बांधण्याचे काम ७० टक्के पूर्ण झालेले आहे. उर्वरित कामही लवकरच पूर्ण केले जाईल, असे दिनकर गोजारे, प्रकल्प विभागाचे प्रमुख, पुणे महापालिका यांनी सांगितले.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणी बरखास्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) पिंपरी-चिंचवड शहर व जिल्हा कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पिंपरी-चिंचवड शहराची नवीन कार्यकारिणी गठित करण्याची जबाबदारी पक्षनिरीक्षक सुनील माने यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

पुण्यात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत पिंपरी-चिंचवडमधील पक्ष संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी पक्षनिरीक्षक सुनील माने आणि पदाधिकाऱ्यांशी शहरातील संघटनात्मक स्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर विद्यमान कार्यकारिणी बरखास्त करून नवीन कार्यकारिणी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. नवीन कार्यकारिणी गठित करण्यापूर्वी डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह आजी-माजी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येणार असून त्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार आहे.

## सारांश वृत्त

### आरक्षण उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी वाल्मिकी समाजाचे आझाद मैदानावर आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** आरक्षण उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयाची महाराष्ट्रात तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी मेहतर वाल्मिकी समाज आरक्षण उपवर्गीकरण कृती समिती आणि बावनी पचायत यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील आझाद मैदानावर एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन करण्यात आले. राज्यातील ३६ जिल्ह्यांतील वाल्मिकी समाजाचे प्रतिनिधी, विविध सामाजिक संस्था आणि सफाई कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलनात उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातीतील सर्वाधिक वंचित घटकांना न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पंजाब आणि हरियाणातील उपवर्गीकरणाच्या अनुभवाचा दाखला देत महाराष्ट्र सरकारनेही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

मुंबईत मुसळधार पावसाचा इशारा असतानाही मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित राहिले.

आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारतर्फे मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलकांशी संवाद साधला. यावेळी आमदार श्याम खोडे आणि आमदार अमित गोरखे यांनीही मार्गदर्शन केले. राज्य सरकार उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत वाल्मिकी समाजाला न्याय देईल, असा विश्वास आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

# चीनने रद्द केल्या १२ हजार महाविद्यालयीन पदव्या; भारताच्या शिक्षण व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), बदलते रोजगार क्षेत्र आणि उद्योगांच्या वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल घडत आहेत. चीनने मागील काही वर्षांत हजारो महाविद्यालयीन अभ्यासक्रम आणि पदवी कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल केले असून, सुमारे १२ हजार महाविद्यालयीन पदव्या रद्द केल्याचा निर्णय देशाच्या उच्च शिक्षण व्यवस्थेतील बदलत्या दिशेचे संकेत देत आहे. या निर्णयातून भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोरही अनेक प्रश्न उभे राहिले आहेत.

चीनने पारंपरिक आणि रोजगाराच्या संधी कमी झालेल्या काही अभ्यासक्रमांऐवजी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, अत्याधुनिक तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि भविष्यातील उद्योगांशी संबंधित क्षेत्रांवर भर देण्यास सुरुवात केली आहे. विद्यार्थ्यांना बदलत्या बाजारपेठेच्या गरजांनुसार कौशल्ये मिळावीत आणि शिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, हा या बदलामागील प्रमुख उद्देश असल्याचे मानले जाते.

गेल्या काही दशकांत जगभरातील उच्च शिक्षण व्यवस्थेत मोठे परिवर्तन झाले आहे. पूर्वी विशिष्ट पदवी मिळवणे हे यशाचे प्रमुख साधन मानले जात होते. मात्र, आता केवळ पदवीपेक्षा विद्यार्थ्यांकडे असलेली कौशल्ये, तांत्रिक ज्ञान आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरत आहे. AI आणि ऑटोमेशनमुळे अनेक पारंपरिक नोकऱ्यांचे स्वरूप बदलत असून, नवीन प्रकारच्या कौशल्यांची मागणी वाढत आहे.

भारतामध्येही उच्च शिक्षणाचा मोठा विस्तार झाला आहे. देशात हजारो महाविद्यालये आणि विद्यापीठे कार्यरत असून दरवर्षी लाखो विद्यार्थी विविध पदव्या घेतात. मात्र, अनेकदा शिक्षण आणि रोजगार बाजारातील गरजांमध्ये तफावत असल्याची टीका केली जाते. काही अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरही विद्यार्थ्यांना अपेक्षित रोजगार मिळत नसल्याने शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होतात.

भारतातील अनेक महाविद्यालयांमध्ये अजूनही काही अभ्यासक्रम पारंपरिक पद्धतीने चालवले जात आहेत. उद्योग क्षेत्रात आवश्यक असलेल्या डिजिटल कौशल्ये, संशोधन क्षमता, नवकल्पना आणि व्यावहारिक प्रशिक्षण यांचा अभाव अनेकदा जाणवतो. त्यामुळे चीनच्या निर्णयाकडे भारतासाठी एक इशारा म्हणून पाहिले जात आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्येही शिक्षण अधिक कौशल्याधारित, बहुविषयक आणि रोजगाराभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षांपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्यामध्ये समस्या सोडवण्याची क्षमता, संशोधन वृत्ती आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे कौशल्य विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, भारताने केवळ नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यापेक्षा जुन्या अभ्यासक्रमांचे नियमित पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. उद्योग, तंत्रज्ञान क्षेत्र आणि समाजातील बदल लक्षात घेऊन विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. अन्यथा अनेक पदव्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या स्पर्धेत मागे टाकू शकतात.

चीनचा अनुभव भारतासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. मोठ्या संख्येने पदवीधर निर्माण करणे हेच शिक्षण व्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट नसून, भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम विद्यार्थी घडवणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानातील वेगवान बदल लक्षात घेता शिक्षण क्षेत्रानेही सातत्याने बदल स्वीकारणे गरजेचे आहे.

भारतासमोर मोठी तरुण लोकसंख्या ही संधी आहे. मात्र, या लोकसंख्येला योग्य शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारक्षम बनवले नाही तर हीच संधी आव्हानात बदलू शकते.

चीनने घेतलेल्या निर्णयातून भारताने आपल्या उच्च शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी ओळखून आवश्यक सुधारणा करण्याची गरज अधोरेखित होते.

भविष्यातील शिक्षण व्यवस्था ही केवळ पदव्या देणारी नसून, विद्यार्थ्यांना बदलत्या जगात टिकून राहण्यासाठी सक्षम करणारी असावी, हा या घडामोडींचा मुख्य संदेश आहे.

## इराणसोबतचा युद्धविराम संपला; चर्चा म्हणजे वेळेचा अपव्यय : ट्रम्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन** इराणसोबतचा युद्धविराम आता संपुष्टात आल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. अमेरिकेकडून झालेल्या नव्या हवाई हल्ल्यांनंतर ट्रम्प यांनी ही प्रतिक्रिया दिली. मात्र, भविष्यात चर्चेचे दरवाजे पूर्णपणे बंद नसल्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत.



इराणसोबत पुन्हा वाटाघाटी करण्याबाबत विचारले असता ट्रम्प यांनी, सध्याच्या परिस्थितीत चर्चा करणे म्हणजे वेळेचा अपव्यय असल्याचे म्हटले. इराणकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने आपण नाराज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अमेरिकेच्या ताज्या कारवाईनंतर मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढला आहे. इराणकडून या हल्ल्यांवर प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली असून, पुढील घडामोडींवर आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष लागले आहे. अमेरिकेने आपल्या कारवाईचे समर्थन करताना सुरक्षेचा मुद्दा पुढे केला आहे, तर इराणने या कारवायांचा निषेध केला आहे. दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक प्रयत्न सुरू राहतील का, याकडे आता सर्वांचे लक्ष आहे.

## अँथ्रॉपिकचा Claude Cowork आता मोबाईल आणि वेबवर; AI एजंट विविध उपकरणांवर करणार काम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील कंपनी अँथ्रॉपिक (Anthropic) ने आपल्या Claude CowoA°k या एआय एजंट सेवेत मोठा विस्तार केला आहे. ही सेवा आता मोबाईल आणि वेब प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्यात आली असून, वापरकर्त्यांना वेगवेगळ्या उपकरणांवर एकाच एआय सहाय्यकासोबत काम करता येणार आहे.

Claude CowoA°k हे केवळ प्रश्नांची उत्तरे देणारे साधन नसून, वापरकर्त्यांच्या कामांमध्ये सक्रिय मदत करणारे एआय एजंट म्हणून विकसित करण्यात आले आहे. दस्तऐवज तयार करणे, माहितीचे विश्लेषण करणे, कामांचे नियोजन करणे आणि विविध डिजिटल कामांमध्ये सहाय्य करणे यांसारख्या सुविधा या माध्यमातून मिळणार आहेत.

अँथ्रॉपिकच्या मते, नवीन विस्तारामुळे वापरकर्त्यांना संगणक, मोबाईल आणि वेब अशा विविध माध्यमांवर अखंड अनुभव मिळेल. एखादे काम एका उपकरणावर सुरू करून दुसऱ्या उपकरणावर पुढे सुरू ठेवण्याची सुविधा यामुळे उपलब्ध होणार आहे.

एआय एजंट तंत्रज्ञान सध्या वेगाने विकसित होत असून, पारंपरिक चॅटबॉटपेक्षा अधिक स्वयंचलित पद्धतीने काम करणाऱ्या प्रणालींवर तंत्रज्ञान कंपन्यांचा भर आहे. वापरकर्त्यांच्या गरजा समजून घेऊन काम पूर्ण करण्याची क्षमता असलेल्या अशा एआय एजंट्सचा वापर भविष्यात व्यावसायिक, शैक्षणिक आणि वैयक्तिक क्षेत्रात वाढण्याची शक्यता आहे. अँथ्रॉपिकची ही घोषणा एआय क्षेत्रातील स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची मानली जात आहे. गुगल, मायक्रोसॉफ्ट आणि ओपनएआयसारख्या कंपन्याही एआय सहाय्यक आणि एजंट तंत्रज्ञानाच्या विकासावर मोठ्या प्रमाणात काम करत आहेत.

## मुंबईतील ५ हजार वृक्षांचे 'रिस्क असेसमेंट'; वादळी वाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर धोकादायक झाडांवर प्रशासनाची नजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबईत वाढत्या वादळी वाऱ्यांमुळे वृक्ष कोसळण्याच्या घटनांचा धोका लक्षात घेता बृहन्मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) वृक्षांचे शास्त्रीय जोखीम मूल्यांकन सुरू केले आहे. बांद्रा (पश्चिम) परिसरातील सुमारे ५ हजार वृक्षांचा प्रायोगिक तत्त्वावर अभ्यास करण्यात येत असून, सहा महिन्यांत त्याचा अहवाल अपेक्षित असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य मनीषा चौधरी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मिसाळ यांनी ही माहिती दिली. त्या म्हणाल्या की, २०२६ च्या पावसाळ्यात मुंबईत ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहत आहेत. अशा परिस्थितीत वृक्षांची सुरक्षितता आणि नागरिकांचा जीवित धोका कमी करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने तपासणी करणे आवश्यक आहे.

मुंबईची दाट लोकवस्ती, अरुंद रस्ते, भूमिगत सेवा वाहिन्या आणि मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली पायाभूत सुविधांची कामे यामुळे अनेक ठिकाणी वृक्षांच्या मुळांच्या नैसर्गिक वाढीवर परिणाम होत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे वृक्षांमध्ये अंतर्गत कुज, संरचनात्मक कमकुवतपणा किंवा पडण्याचा धोका आढळल्यास वृक्ष प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर पुढील कारवाई केली जाते.

या प्रकल्पासाठी 'द स्माईल कॉन्सील' यांच्या माध्यमातून मे. ट्रीकोटेक एलएलपी या वृक्षतज्ज्ञ संस्थेची २१ मार्च २०२६ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने वृक्षांची स्थिती तपासून संभाव्य धोकादायक झाडांची ओळख पटविणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे.

दरम्यान, रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासोबत भूमिगत सेवा वाहिन्यांसाठी डक्ट प्रणालीचा वापर करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यामुळे सेवा वाहिन्या टाकताना वृक्षांच्या मुळांना होणारी हानी कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रायोगिक प्रकल्पाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हीच कार्यपद्धती मुंबईतील इतर भागांमध्येही लागू करण्याचे नियोजन असल्याचे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी स्पष्ट केले.

मात्र, पर्यावरण तज्ज्ञांच्या मते केवळ धोकादायक वृक्षांची तपासणी न करता मुंबईतील जुन्या वृक्षांचे संवर्धन, मुळांसाठी पुरेशी जागा आणि शास्त्रीय पद्धतीने वृक्ष व्यवस्थापन यावरही प्रशासनाने भर देणे आवश्यक आहे.


## जगातील १० आनंदी शहरांची यादी जाहीर; इंग्लंडमधील शहर अव्वल, जयपूर सहाव्या क्रमांकावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जगातील सर्वाधिक आनंदी शहरांची २०२६ ची यादी जाहीर झाली असून, इंग्लंडमधील एका शहराने या क्रमवारीत पहिला क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे भारतातील जयपूर शहराने या यादीत सहावे स्थान मिळवत जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केली आहे.

या क्रमवारीत शहरांचे मूल्यांकन करताना नागरिकांचे जीवनमान, सामाजिक संबंध, मानसिक आरोग्य, पर्यावरण, स्थानिक प्रशासन, संस्कृती, सुरक्षितता आणि नागरिकांचा एकूण समाधानाचा स्तर यांसारख्या घटकांचा विचार करण्यात आला आहे.

इंग्लंडमधील आरश्टर (अऑलहर्शीशऑ) शहराने आनंदी शहरांच्या यादीत अव्वल स्थान मिळवले आहे. नागरिकांचा जीवनाबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन, समुदायभावना आणि राहणीमानाची गुणवत्ता यामुळे या शहराला सर्वोच्च स्थान मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे.




भारतासाठी अभिमानाची बाब म्हणजे राजस्थानची राजधानी जयपूर या यादीत सहाव्या क्रमांकावर आहे. ऐतिहासिक वारसा, समृद्ध संस्कृती, पर्यटन, स्थानिक जीवनशैली आणि नागरिकांमधील सामाजिक जिव्हाळा यामुळे जयपूरने जागतिक स्तरावरील आनंदी शहरांच्या यादीत स्थान मिळवले आहे.

यादीतील इतर शहरांमध्ये युरोप, अमेरिका आणि आशियातील विविध शहरांचा समावेश आहे. या शहरांनी आधुनिक सुविधा आणि मानवी संबंध यांचा समतोल राखत नागरिकांना चांगले जीवनमान उपलब्ध करून दिले आहे.

तज्ज्ञांच्या मते, शहराचा विकास केवळ आर्थिक प्रगतीवर अवलंबून नसून नागरिकांचे मानसिक समाधान, सामाजिक सुरक्षितता आणि जीवनातील आनंद हे घटकही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे भविष्यात शहर नियोजन करताना या बाबींना अधिक महत्त्व दिले जाण्याची गरज आहे.

जयपूरचा या यादीतील समावेश भारतातील शहरांच्या बदलत्या प्रतिमेचे उदाहरण मानला जात असून, सांस्कृतिक वारसा आणि आधुनिक विकास यांचा योग्य मेळ साधल्यास भारतीय शहरेही जागतिक स्तरावर आघाडी घेऊ शकतात, असे मत व्यक्त केले जात आहे.

# श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी आषाढी पालखी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान; हजारो वारकऱ्यांचा दिंडीमध्ये सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नेवासा :** नेवासा संतश्रेष्ठ महावैष्णव श्री ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी असलेल्या तिर्थक्षेत्र नेवासा येथून ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी आषाढी पालखी सोहळा दिंडीने टाळ मृदुंगाच्या गजरात व ''ज्ञानोबा माऊली तुकाराम''चा जयघोष करत पंढरपूरकडे प्रस्थान केले.यावेळी ''माऊली माऊली''च्या गजराने नेवासेनगरी दुमदुमली होती. नेवासा येथून माऊलींच्या निघालेल्या या पालखी दिंडी सोहळयामध्ये हजारो वारकरी भाविक सहभागी झाले होते.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज ''पैस''खांब मंदिर निर्माते वैकुंठवाशी गुरुवर्य श्री बन्सी महाराज तांबे यांच्या कृपा आशीर्वादाने ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ही दिंडी निघाली असून आळंदीच्या धर्तीवर बनवलेला माऊलींचा पालखी रथ नेवासकरांचे आकर्षण ठरला होता. तीर्थक्षेत्र नेवासा नगरीत श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पावन पदस्पर्शाने पुन्हा एकदा भक्तिरस नांदला असल्याची भावना भाविकांमध्ये होती.

दिंडी प्रस्थानापूर्वी श्री क्षेत्र देवगड संस्थानचे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व पैठण येथील संत एकनाथ महाराजांचे वंशज श्री मेघ:शाम गोसावी महाराज यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात माऊलींच्या पादुकांचे अभिषेक करून पूजन करण्यात आले.यावेळी झालेल्या अभिषेक सोहळयाच्या प्रसंगी गंगापूर येथील श्री विठ्ठल आश्रमाचे रामभाऊजी महाराज राऊत,हभप उद्धवजी महाराज मंडलिक



नेवासेकर,श्रीराम महाराज झिंजुर्डे, छोटे माऊली कदम,गणेश महाराज आरगडे, राम महाराज भोगे,महंत ऋषिकेशनाथ महाराज, ह.भ.प.हारदे महाराज, राम महाराज बोचरे, ज्ञानेश्वर महाराज, भगवान महाराज जंगले शास्त्री या संतांसह आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,माजी आमदार नरेंद्र घुले , माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे,क्षितिज घुले विश्वास गडाख,उदयन गडाख, अध्यक्ष पांडुरंग अभंग पंचगंगा चे प्रमुख प्रभाकर शिंदे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,ॲड. संजय सुखधान, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, मुख्याधिकारी निखिल फराटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.भागवत दहिफळे, यावेळी उपस्थित होते.उपस्थित संत महंतांच्या हस्ते पालखी रथात ठेवण्यात आलेल्या माऊलींच्या पादुकांचे पूजन करण्यात आले.

या पालखी सोहळयामध्ये केलेल्या आवाहना नुसार असंख्य दिंड्या सहभागी झाल्या होत्या.संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणातून पालखी दिंडी नेवासा शहरात नगर परिक्रमेसाठी आली असता या दिंडीचे रामकृष्ण नगर येथे ह.भ.प.नंदकिशोर महाराज खरात, आढाव महाराज ,चक्रनारायण परीवार यांनी,श्री संत तुकाराम महाराज मंदिर येथे ह.भ.प.उद्धव महाराज मंडलिक नेवासकर, खंडाळे परिवाराच्या वतीने स्वागत केले.